दैनिक आरंभ मराठी
15 Sep 2024 - Page 3
epaper.arambhmarathi.com

# सायबर सुरक्षा जनजागृती कार्याबद्दल प्रतीक्षा पांगे यांचा सत्कार

**आरंभ मराठी । उमरगा**

उमरगा तालुक्यातील कोरेगाव येथील रहिवाशी व सद्या राजश्री शाहू महाविद्यालय लातूर येथे शिकत असलेली केवळ हीत फाउंडेशनच्या व राजश्री शाहू महाविद्यालय यांच्या माध्यमातून सायबर तज्ञ कु. प्रतीक्षा पांगे यांच्यामार्फत मराठवाड्यात विविध ठिकाणी सायबर गुन्ह्याबाबत जनजागृती करण्यासाठी कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. मोबाईल वापरामुळे सायबर गुन्ह्याच्या प्रमाणात कमालीची वाढ झाली असून सद्या विद्यार्थी व महिला या सायबर गुन्हेगारांचे लक्ष ठरत आहेत. याकरिता सायबर तज्ञ कु.प्रतीक्षा पांगे यांच्याद्वारे केले जाणारे जनजागृतीचे कार्य कौतुकास्पद असुन व कु. पांगे यांच्यामुळे उमरगा तालुक्याचा नाव लौकिकही होत असल्याचे सांगत आमदार ज्ञानराज चौगुले यांनी त्यांच्या सत्कार करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




यावेळी तालुकाप्रमुख बळीराम सुरवसे, युवती सेना मराठवाडा निरीक्षक आकांक्षाताई चौगुले, गणप्रमुख शरद इंगळे, विद्यार्थीसेना तालुकाप्रमुख संदीप चौगुले, युवा सेना शहर प्रमुख अमर शिंदे, राज शिंदे आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.